महाराष्ट्र पोलीस

# वाहतुक शाखा, पुणे शहर
## पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
## बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ७४९३ /२०२३ दिनांक :- १४/१० /२०२३

**विषय :- नवरात्र उत्सव : २०२३ निमित्त वाहतूक व्यवस्थेत करण्यात येणा-या बदला बाबत.....**

पुणे शहरात दिनांक १५/१०/२०२३ ते दिनांक २४/१०/२०२३ या कालावधीत **"नवरात्र उत्सव"** साजरा होत आहे. नवरात्र उत्सव कालावधीमध्ये भाविक गोठया संख्येने चतु:श्रृंगी मंदीर, भवानी माता मंदीर व तांबडी जोगेश्वरी मंदीर या ठिकाणी दर्शनास येतात, भाविकांना सुखरूपपणे दर्शन घेता यावे, तसेच वाहतुकीची कोंडी येऊ नये म्हणून वाहतूक व्यवस्थेत खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

### १) आप्पा बळवंत चौक

- आप्पा बळवंत चौक हे बुधवार चौकाकडे जाणारा रस्ता वाहतुकीकरता बंद करण्यात येऊन बुधवार चौक ते आप्पा बळवंत चौक अशी एकेरी वाहतुक चालु राहील. सदरचा बदल आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

### पर्यायी मार्ग

- ✓ आप्पा बळवंत चौक, गाडीतळ पुतळा येथुन शिवाजी रोडने इच्छित ठिकाणी जाता येईल.

### *२) भवानी माता मंदीर*

- रामोशी गेट चौक ते जुना मोटार स्टॅण्ड या दरम्यानचा भवानी माता मंदीरासमोरील महात्मा फुले रस्ता अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन सर्व प्रकारच्या वाहनांना दोन्ही बाजुंनी बंद करण्यात येणार असुन या महात्मा फुले रस्त्यावर सर्व प्रकारच्या वाहनांना नो-पार्किंग करण्यात येत आहे. वाहन चालकांनी पंडीत नेहरु रोडवरील व इतर रोडवरील पार्किंग झोनमध्ये वाहने पार्क करावीत.

### *पर्यायी मार्ग*

१. संत कबीर चौक बाजूने येऊन रामोशी गेट चौकाकडून भवानी माता रस्त्याने जाणाऱ्या वाहन चालकांनी ए.डी. कॅम्प चौकातून डावीकडे वळून भारत सिनेमा-पदमजी चौकी चौक-उजवीकडे वळून जुना मोटार स्टॅण्ड पर्यंत येऊन इच्छितस्थळी जावे.

२. ढोले पाटील चौक बाजूने येऊन रामोशी गेट चौकी समोरून भवानी माता मंदीर रस्त्यावरून जुना मोटार स्टॅण्ड कडे जाणारे वाहन चालकांनी भगवान बाहुबली चौकातुन जुना मोटार स्टॅण्ड कडे जावे. यासाठी मा. माणिकदास महाराज चौक ते भगवान बाहुबली चौक या दरम्यानच्या जाधव रस्त्यावरील एकेरी मार्ग वाहतूक निर्बंध नवरात्र उत्सव कालावधी पुरता शिथील करण्यात येत आहे.

३. रामोशी गेट येथुन जाणारे पी.एम.पी.एल. बसेसची वाहतुक सेव्हन लव्हज चौक येथुन डावीकडे वळून गोळीबार मैदान चौक, डावीकडे वळून खाणेमारुती चौक अशी सुरु राहिल. जेणेकरुन नवरात्र उत्सवादरम्यान भवानी माता मंदीर या भागात वाहतुक कोंडी होणार नाही.

४. सेव्हन लव्हज चौकातुन येणारी वाहतुक गोळीबार मैदानाकडे वळविण्यात यावी. मालधक्का चौकाकडुन येणारी वाहतुक आर.टी.ओ.-पुणे स्टेशन-डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा या ठिकाणी वळविण्यात यावी. बोल्हाई चौकातुन जाणारी वाहतुक मालधक्का चौक येथे वळविण्यात यावी. ट्रेझरी शाखेसमोरील बर्के आळीत जाणारी वाहतुक ही बोल्हाई चौकातुन मालधक्का चौक येथे वळविण्यात यावी. तसेच बॅनर्जी चौकातुन पॉवर हाऊस चौक येथे जाणारी वाहतुक ही बंद करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

### ३) तांबडी जोगेश्वरी मंदीर

१. लक्ष्मी रस्त्यावरील गणपती चौक ते तांबडी जोगेश्वरी मंदीर या दरम्यानचे तांबडी जोगेश्वरी रस्त्यावर प्रवेश बंद करण्यात येत आहे.

२. सकाळ प्रेस कडून जोगेश्वरी मंदीरकडे जाण्यास अत्यावश्यक सेवा वगळून सर्व प्रकारचे वाहनांस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

#### पर्यायी मार्ग

लक्ष्मी रस्त्याने गणपती चौकात येऊन जोगेश्वरी मंदीराकडे वळण घेणाऱ्या वाहन चालकांनी सरळ सेवासदन चौक उजवीकडे वळून बाजीराव रस्त्याने आप्पा बळवंत चौक उजवीकडे न वळता सरळ शनिवारवाडा मार्गे पुढे इच्छितस्थळी जातील.

#### नो-पार्कींग

१. तांबडी जोगेश्वरी, ३३ बुधवार पेठ, पुणे, २. अष्टभूजा देवी मंदीर, ४२४, शनिवार पेठ, पुणे, ३. अष्टभूजा दुर्गादेवी, ६२४, नारायण पेठ, पुणे या ठिकाणी नवरात्रौत्सवातील १० दिवसांकरीता अत्यावश्यक सेवा खेरीज करून आवश्यकतेप्रमाणे **सर्व प्रकारच्या वाहनांचे पार्कींग करीता बंदी** करण्यात येत आहे तसेच यापुर्वी या रस्त्यांवर असणारी पार्कींग व्यवस्था नमूद कालावधी करीता स्थगित करण्यात येत आहे.

#### पार्कींग

देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या नागरीकांनी संभाव्य गैरसोय टाळणेसाठी त्यांची वाहने खालील ठिकाणी **पार्क करावीत**.

१. टिळक पुल ते भिडे पुल दरम्यानचे नदीपात्रातील रस्त्यावर,
२. मंडई येथील मिनर्व्हा व आर्यन / कै.सतिश मिसाळ पार्कींग तळावर,
३. या भागातील रस्त्यांवरील पार्कींग झोनमध्ये.

### ४) चतुःश्रृंगी माता मंदीर

देवीचे दर्शनासाठी भाविकांची गर्दी होवुन सेनापती बापट रोडवर वाहतुक कोंडी झाल्यास पत्रकार नगर चौकाकडुन सेनापती बापट रोड जंक्शन कडे येणारी वाहतुक आवश्यकतेप्रमाणे शिवाजी हौंसीग चौकाकडुन सेनापती बापट रस्त्याचे डावे बाजुने एकेरी सोडण्यात येतील. सदर रस्त्यावर गर्दी वाढल्यास आवश्यकतेप्रमाणे मंदिराकडे जाणारे रस्त्यावरील वाहने चतुःश्रृंगी मंदिराकडे न सोडता वेताळबाबा चौकातुन दिप बंगला चौक मार्गे तसेच शिवाजी हौंसीग चौकातुन उजवीकडे वळुन ओम सुपर मार्केट मार्गे सोडण्यात येतील.

कॉसमॉस जंक्शन कडुन सेनापती बापट रोडवर येणारे भाविकांनी त्यांची वाहने पॉलिटेक्निक मैदानावर पार्कींगकडे जाण्यासाठी शिवाजी हौसिंग चौकातून डावे बाजुस वळुन कै. सावंत चौकातुन फिरोदीया पथ मार्गे घेवुन जावीत.

वीर चाफेकर चौकाकडुन चतुःश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी येणारे वाहनचालकांनी त्यांची वाहने सुर्यमुखी दत्त मंदिर चौकातुन डावे बाजुने थोरात चौकातुन दिप बंगला चौक मार्गे तसेच गणेशखिंड रोडवरील संगण्णा धोत्रे पथ व खाऊ गल्ली मार्गे पॉलिटेक्निक पार्कींग गेट कडे घेवुन जावे.

तरी नागरीकांनी व वाहन चालकांनी वरील नमूद निर्बंध केलेल्या मार्गांवर येण्याचे टाळावे तसेच पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

१४/१०

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- सर्व संबंधितांना

Scanned with OKEN Scanner